# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मौजे जांबा (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथील गावठाण्याची हद्द वाढविण्याबाबत**

**(१) ५४०० (०४-०४-२०१५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे जांबा (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथील गावठाण्याची हद्द वाढविण्याबाबत मागील दोन वर्षापासून कार्यवाही सुरु असूनही सदरहू गावाची हद्द वाढविण्याबाबत अद्यापी कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू गावाच्या गावठाणाची हद्द वाढविण्याबाबत मागील दोन वर्षापासून दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०३-२०१८) :** (१), (२), (३) हे खरे नाही. मौजा जांब (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथील गावठाणाची हद्द वाढविण्याबाबत प्रस्ताव उपविभागीय अधिकारी, तुमसर यांचे दिनांक १९.०६.२०१४ चे पत्रान्वये जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाले आहे. सदर प्रस्तावात त्रुट्या असल्याने गावठाणाची हद्द वाढविण्याबाबतचे प्रस्ताव आक्षेपाची पूर्तता करणेबाबत जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख, भंडारा यांना पाठविण्यात आले. तद्नंतर मौजा जांब येथील गावठाणाची हद्दवाढीबाबत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १२२ अन्वये दिनांक ७.१२.२०१७ रोजी जिल्हाधिकारी यांनी मान्यता प्रदान केलेली आहे. त्याबाबत, अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे.

सदरील प्रस्ताव सदोष व तांत्रिकदृष्ट्या परिपूर्ण नसल्याने त्रृट्यांची पूर्तता करताना थोडासा विलंब झालेला आहे.

---

**राजापूर (रत्नागिरी) येथील साखरीनाटे बंदरातील गाळ काढण्याबाबत**

**(२) १९६१० (१२-०८-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (रत्नागिरी) येथील साखरीनाटे बंदरातील गाळ गेले अनेक वर्षे काढला न गेल्यामुळे साखरीनाटे बंदराच्या मुखाशी सुमारे एक ते दीड किमी अंतराच्या समुद्रात मोठ्या प्रमाणात गाळ साचून वाळूच्या भिंती तयार झाल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गाळ साचल्यामुळे नौका समुद्रात लोटणे आणि मासेमारी करुन परत किना-यावरील लावण्यासाठी मोठा अडसर निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच येथील जेटीचा प्रश्नही गेल्या कित्यके वर्षापासून प्रलंबित असून सन २००४ मध्ये जेटीच्या कामाचे भुमिपुजन होऊन सुमारे दहा वर्षाचा कालावधी लोटला तरी अद्यापही जेटीच्या बांधकामाला प्रारंभ झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२७-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) सदर जेट्टीच्या कामास सन २००३ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. तथापि केंद्र शासनाने सदर प्रस्तावास मान्यता न दिल्यामुळे बांधकामास प्रारंभ करता आला नाही.

(४) केंद्र पुरस्कृत सागरमाला योजना सन २०१७-१८ अंतर्गत साखरीनाटे बंदर विकसित करण्याचे रु.२७९.८५ कोटी रकमेचे काम प्रस्तावित केले असून त्यापैकी रु.४.२० कोटी रक्कम गाळ काढण्यासाठी प्रस्तावित केलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या नियमाप्रमाणे इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय गाळ्यांची विक्री न करण्याबाबत**

**(३) २१६९९ (१६-०९-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या नियमांप्रमाणे इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय गाळ्यांची विक्री करता येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भोगवटा प्रमाणपत्र नसलेल्या सर्व इमारतीची माहिती गोळा करण्यासाठी स्वतंत्र कक्ष स्थापण्याचा निर्णय महानगरपालिकेने माहे ऑगस्ट, २०१२ मध्ये वा त्या दरम्यान घेतला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई महानगरपालिका हद्दीतील किती इमारती भोगवटा प्रमाणपत्र नसलेल्या आढळल्या आहेत,
(४) असल्यास, भोगवटा प्रमाणपत्र नसलेल्या व गाळे विक्री केलेल्या बांधकाम व्यावसायिकांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

विकास नियंत्रण नियमावलीत अशा स्वरुपाची तरतूद आढळून येत नाही.

(२) हे खरे नाही.
(३) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उरण (जि.रायगड) तालुक्यातील जे.एन.पी.टी बंदरातून अवजड वाहनांच्या वाहतूकीमुळे अपघात होत असल्याबाबत

**(४) ३७१४२ (२३-०२-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) तालुक्यातील जे.एन.पी.टी बंदरातून मोठ्या प्रमाणात अवजड वाहनांची वाहतूक केली जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अवजड वाहनांच्या वाहतूकीमुळे मोठ्या प्रमाणात अपघात होत असल्याने औषधोपचार करण्यासाठी व अपघातग्रस्त व्यक्तींचा विमा काढण्यासाठी मा.मुख्य सचिव यांचेकडे ग्रामस्थांच्या वतीने मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१७-०३-२०१८) :** (१), (२) व (३) अपघातग्रस्त व्यक्तिंच्या आर्थिक दायित्वासाठी केंद्र शासनाव्दारे सन १९८९ मध्ये सोलॅशिअम स्किम योजना तयार करण्यात आली असून सदर योजनेत जिल्हापातळीवर अपघातग्रस्तांचे विम्याव्दारे आर्थिक दायित्वाचे उक्त योजनेत प्रयोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**एमएमआरडीए क्षेत्रामध्ये प्रदेश परिवहन क्षेत्रानुसार**
**रिक्षा परवाना वाटप करण्याबाबत**

**(५) ३९७५० (१५-०५-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाचा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) क्षेत्र निहाय परवाने वाटपाचा निर्णय तातडीने स्थगित करून प्रादेशिक परिवहन क्षेत्र निहाय परवान्यांची सोडत काढण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी माहे जानेवारी, २०१६ वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.परिवहन मंत्री व रायगड जिल्ह्याचे पालक मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) क्षेत्रात रिक्षा परवाना मिळण्यासाठी १,३८,००० अर्जांपैकी फक्त ३५६२८ परवान्यांचेच वाटप होणार, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परिवहन विभागाकडून दिनांक २८.१२.२०१५ रोजी रात्रीपासून अचानकपणे अर्ज मागविण्याची सुरुवात झाल्याने शेकडो रिक्षा चालकांना मुदत माहित नसल्यामुळे विहित मुदतीत अर्ज दाखल करू शकले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बेरोजगार तरुणांना रोजगार मिळण्याबाबत तसेच एमएमआरडीए क्षेत्रामध्ये प्रदेश परिवहन क्षेत्रानुसार रिक्षा परवाना वाटप करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१२-०२-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

परिवहन विभागाकडून प्रमुख वृत्तपत्रात दि.३०/१२/२०१५ रोजी ऑटोरिक्षा परवाना वाटपासंदर्भात जाहिरात देण्यात आली होती. अर्ज स्विकारण्याची मुदत दि.३१/१२/२०१५ ते दि.०७/०१/२०१६ पर्यंत होती.

(४) मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण क्षेत्रामध्ये सुमारे ३५,६२८ रिक्षा परवाना वाटप करण्यात आले आहे. प्रत्येक रिक्षा २ पाळीमध्ये चालते. त्यामुळे सुमारे ७०,००० बेरोजगारांना उपजिविकेचे साधन प्राप्त झाले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अपघातामध्ये महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर असल्याबाबत**

**(६) ६३७६३ (१५-०५-२०१७). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अपघातामध्ये महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर असून शहरातील अपघातामध्ये मुंबई पहिल्या क्रमांकावर असल्याचे नॅशनल क्राईम रेकॉर्डस ब्यूरोने माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान प्रसिध्द केलेल्या अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती अपघातांच्या कारणांबाबत व अपघातांना प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१८) :** (१) नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या अहवालाचे अवलोकन केले असता अपघातामध्ये महाराष्ट्र देशात दुसऱ्या नव्हे तर तिसऱ्या क्रमांकावर असल्याचे आढळून येते. तर मोठया शहरातील अपघातांमध्ये मुंबई शहराचा क्रमांक चौथा असल्याचे दिसून येत आहे.
(२) व (३) अपघातांना प्रतिबंध करण्याबाबत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यांत येतात :-

i) महामार्गाच्या प्रत्येक वाहिनीच्या चढणी/उतरणीवर तसेच मध्यावर माहिती/ सूचनादर्शक आशायाचे रात्रीच्या वेळेतही वाहनचालकांना दुरुन दृष्टीपथात येथील असे (फलुरोसेंट) फलक लावण्यांत आले आहेत.

ii) अपघात टाळण्याकरीता वाहनचालकांच्या माहितीकरीता अपघातप्रवण क्षेत्र, गतिरोधक, वेगमर्यादा, पुढे शाळा आहे, पादचारी क्रॉसींग, नो पार्किंग इ. फलक ठरावीत अंतरावर लावण्यांत येतात.

iii) नागरीकांनी मोटारसायकल वापरतांना हेल्मेटचा वापर करणे अत्यावश्यक असल्याबाबत शाळांमध्ये, महाविद्यालयांमध्ये जागृती करण्यांत आली आहे. तसेच प्रसिध्दीमाध्यमांद्वारे प्रसिध्दी देण्यांत आली आहे.

iv) महामार्गांवर रस्तादुभाजक व पुलाचे कठडे दिसावेत याकरीता रेडियम पटटया व रिफलेक्टर लावण्यांत आले आहेत.

v) रस्त्यावर रात्री अपघात होऊ नये याकरीता स्ट्रीट लाईट लावण्यांत आल्या आहेत.

vi) आवश्यक त्या प्रत्येक चौकात वाहतूक पोलीस अंमलदार यांची वाहतूकीचे नियमन करण्यासाठी नेमणूक करण्यांत येते.

vii) मद्यपी वाहनचालकांवर कारवाई करण्यासाठी ड्रंक अँड ड्राईव्ह मोहिम वेळोवेळी राबविण्यांत येते.

viii) रोडवरील जंक्शनच्या मध्यभागी हॅलोजन लाईटसची व्यवस्था करण्यांत आली आहे.

ix) रस्त्यावरुन जाणाऱ्या मोकाट जनावरांमुळे होणारे अपघात टाळण्यासाठी जंक्शनच्या ठिकाणी लोखंडी बॅरिकेटसचा वापर करुन त्याप्रमाणे दक्षता घेण्यांत येते.

x) बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या चालकांवर वेळोवेळी मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करण्यांत येते.

xi) वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालक व मालक यांचेवर जरब बसविण्यासाठी मुंबई वाहतूक विभागामार्फत सीसीटीव्ही यंत्रणेद्वारे दंडात्मक कारवाई करण्यांत येते.

xii) मुंबई शहरात वेगमर्यादेपेक्षा जास्त वेगाने वाहन चालविणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करण्यासाठी महत्वाचे महामार्ग व रस्त्यांवर स्पिड कॅमेरे बसविण्यांत आले आहेत. त्याद्वारे कारवाई करण्यांत येते.

xiii) शहरातील वाढत्या अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी मुंबई वाहतुक शाखेतर्फे बृहन्मुंबईत सन १९५७ पासून रस्ता सुरक्षा दलाचे प्रशिक्षण देण्यांत येत असून सध्या शहरात ५०५ शाळांमधील एकूण ६२,००० विद्यार्थ्यांना एस.आर.पी. (रस्ता सुरक्षा दल) च्या माध्यमातून प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्यांत आले आहे. याकरीता एकूण २७ अंमलदारांची नेमणूक करण्यांत आलेली आहे.

xiv) वाहतूक चिल्ड्रेन पार्क : रस्ता सुरक्षिततेचे प्रशिक्षण देण्याकरीता मुंबईत दोन वाहतूक चिल्ड्रेन पार्कचे निर्माण करण्यांत आले आहे.

xv) वाहतूक मोबाईल पार्क (फिरते प्रदर्शन वाहिनी) : या माध्यमातून शाळेतील मुलांना रस्ता सुरक्षितता व वाहतुकीच्या नियमाबाबत प्रात्याक्षिकासह प्रशिक्षण देण्यांत येते.

xvi) रस्ता सुरक्षा अभियान : शासनातर्फे यावर्षी राबविण्यांत आलेल्या २७ व्या रस्ता सुरक्षा अभियानाच्या निमित्ताने शहरभर पोस्टर्स व बॅनर्स लावून जोरदार जनजागृती मोहिम राबविण्यांत आली तसेच पथनाटयाच्या माध्यमातून जनजागृती करण्याचे आयोजन करण्यांत आले होते.

xvii) शहरातील विविध महाविद्यालये व माध्यमिक शाळांमध्ये रस्तासुरक्षा विषयक व्याख्याने आयोजीत करण्यांत येतात. तसेच वेगवेगळया कंपन्यांमधील कामगार, वाहनचालक, अभियंते यांच्याकरीता रस्ता सुरक्षा अभियानाअंतर्गत व्याख्याने आयोजीत करुन त्यांना माहिती व मार्गदर्शन करण्यांत येते.

xviii) बेदरकारपणे वाहन चालविणाऱ्यांवर वेळोवेळी मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करण्यांत येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सुमारे १ लाख २२ हजार रिक्षा चालकांनी परवाना नूतनीकरणाची संधी गमावली असल्याबाबत**

**(७) ६४८३९ (१५-०५-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात परवानाधारकाचे निधन, दंडात्मक कारवाईची थकीत रक्कम, परवाना हस्तांतरित न करणे अशा विविध कारणांमुळे सुमारे १ लाख २२ हजार रिक्षा चालकांनी परवाना नूतनीकरणाची संधी गमावल्याची बाब माहे जुलै, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशीकरुन राज्यातील सदरहू परवाना नूतनीकरणाची संधी गमावलेल्या रिक्षा चालकांना दंड आकारून पुनश्च परवाना नूतनीकरणाची संधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०८-०३-२०१८) :** (१) व (२) नूतनीकरणाची संधी गमावलेल्या परवाना धारकांकरीता दि.०१.१०.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये दि.३१.१०.२०१५ पर्यंत परवाने नुतनीकरण करण्यासाठी मुदतवाढ दिली होती. तद्नंतर दि.१६.११.२०१५, दि.३०.११.२०१५ व दि.१५.१२.२०१५ अशी तीन वेळा परवाने नुतनीकरण करण्याकरीता मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच नुतनीकरणाची संधी गमावलेल्या परवाना धारकांकरीता दि.१३.०७.२०१६ रोजी सुधारित अधिसूचना निर्गमित केली असून मुदत समाप्तीनंतर विहित शुल्क आकारून परवाना नुतनीकरणाचे उक्त नियमात प्रयोजन करण्यात आलेले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील अणुशक्तीनगर विधानसभा कार्यक्षेत्रातील आर सी एफ गेट नं ४ सी जी गिडवाणी रोड पांजरापोळा तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गावरील अनधिकृत पार्किंग त्वरित हटविण्याबाबत

**(८) ६४८५८ (२३-०८-२०१६). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील अणुशक्तीनगर विधानसभा कार्यक्षेत्रातील आर सी एफ गेट नं ४ सी जी गिडवाणी रोड पांजरापोळा तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौक, येथे मोठ मोठे डम्पर,लॉरी, ट्रक, टॅकर, अनधिकृतपणे डबल पार्किंग करुन उभे असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पार्किंगमुळे स्थानिक नागरिकांना तसेच वाहन चालकांना अनेक अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास अनेक वेळा सह पोलिस आयुक्त (वाहतूक) तसेच संबंधित मंत्रीमहोदयाकडे पत्रव्यवहार करुनही अद्याप कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(५) असल्यास, चौकशीअंती उक्त मार्गावरील अनधिकृत पार्किंग त्वरित हटविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-११-२०१७) :** (१) हे खरे आहे.
नमूद मार्गावर पेट्रोल पंप असून जवळच ट्रान्सपोर्ट कार्यालय असल्याने तसेच बहुसंख्य चालक हे जवळच्या वस्तीत राहत असल्याने तेथे काही काळ वाहने पार्क होतात.
(२) हे खरे नाही.
सदर परिसरात वाहतूक विभागाचे अधिकारी व अंमलदार नियमित गस्त घालून वाहतुकीची कोंडी होणार नाही तसेच नागरीक व वाहनचालकांना अडचणी येणार नाही याची दक्षता घेत असतात.

(३) हे खरे नाही.
(४) व (५) सदर परिसरात पार्किंगमुळे अडथळा निर्माण करणाऱ्या अनुक्रमे २५४ व २९ वाहनचालकांवर सन २०१६ व २०१७ मध्ये कारवाई करण्यांत आलेली आहे. सदर ठिकाणी वाहतूक विभागाचे अंमलदार वेळोवेळी गस्त करुन अनधिकृत पार्किंगच्या गाडया काढून लावतात तसेच कायदेशीर कारवाई करतात व वाहने अनधिकृतरित्या पार्किंग होणार नाही याची दक्षता घेण्यांत येते.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहर व हद्दीत अनधिकृत बेकऱ्या आढळून आल्याबाबत

**(९) ७४१५३ (२०-०४-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहर व हद्दीत असलेल्या १२६ बेकऱ्यांच्या तपासणीत ३० बेकऱ्या अनधिकृत आढळून आल्या असून १२० बेकऱ्यांअंतर्गत अनियमितता आढळून आली असल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विनापरवाना चालत असलेल्या बेकऱ्या, स्वच्छतेचा अभाव, कामगारांच्या कामाच्या ठिकाणची राहण्याची व्यवस्था व पदार्थांसाठी निकृष्ट साहित्याचा वापर अशा बाबी प्रामुख्याने निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने सर्वसामान्यांच्या व बेकारी कामगारांच्या आरोग्याच्या दृष्टीने संबंधित बेकऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२२-०३-२०१८) :** (१) पुणे शहरात अन्न व औषध प्रशासनाने डिसेंबर, २०१६ ते जानेवारी, २०१७ या कालावधीत विशेष मोहिम राबवून एकूण १०८ बेकऱ्यांची तपासणी केली होती. त्यापैकी १०२ बेकऱ्यांतर्गत अनियमितता आढळून आली आहे. सदर १०२ पैकी १५ बेकऱ्या विनापरवाना आढळल्या आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) अन्न व औषध प्रशासनाने डिसेंबर, २०१६ ते जानेवारी, २०१७ या कालावधीत विशेष मोहिम राबवून एकूण १०८ बेकऱ्यांच्या तपासण्या केल्या आहेत.

त्यापैकी ३५ बेकऱ्यांना सुधारणा नोटीसा पाठविण्यात आल्या आहेत. त्यापैकी ०९ प्रकरणे सुधारणा नोटीसची पुर्तता केल्याने दप्तरी दाखल केली आहेत. तर ०३ बेकऱ्यांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. उर्वरीत २३ प्रकरणी न्यायनिर्णय खटला दाखल करण्यात आला असून १७ बेकऱ्यांना रु. १ लाख ९३ हजार इतका दंड ठोठावला आहे. तर ६ प्रकरणी सुनावणी चालु आहे.

०८ बेकऱ्यांनी तपासणी अहवालातील त्रुटींची पुर्तता केल्याने सदर प्रकरण दफ्तरी दाखल केले आहे व १ बेकरी बंद झाली आहे.

उर्वरीत ६४ प्रकरणी तडजोड शुल्क आकारणीकरता दाखल करण्यात आली होती. त्यापैकी ५२ प्रकरणामध्ये रु.३ लाख ५८ हजार तडजोड शुल्क आकारण्यात आला आहे. तर १२ प्रकरणी त्रुटींची पुर्तता केल्याने दफ्तरी दाखल करण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्हयात प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेमध्ये शेतक-यांकडून व वितरकांकडून प्रस्तावातील त्रुटींची पूर्तता होत नसल्याबाबत**

**(१०) ७७५२० (१४-०४-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयात प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेमध्ये शेतक-यांकडून व वितरकांकडून प्रस्तावातील त्रुटींची पूर्तता होत नसल्यामुळे अनुदान वाटपाचा प्रश्न निर्माण झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे सद्यस्थितीत येथील कृषि विभागाकडे सुमारे आठ कोटी रुपये थकित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर शेतकरी व वितरक यांना प्रस्तावातील त्रुटी दुर करण्यासाठी मार्गदर्शन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१९-०३-२०१८) :** (१) व (२) सदर योजनेंतर्गत जिल्हयातील इच्छुक लाभार्थीकरीता प्रत्यक्षात आवश्यक असलेल्या निधीपेक्षा जास्त निधी उपलब्धकरुन देण्याची मागणी संबंधित जिल्हयाकडून प्राप्त झाल्यामुळे उपलब्ध करुन दिलेला निधी हा अखर्चित राहिला आहे.

(३) सन २०१६-१७ या वर्षात हिंगोली जिल्हयासाठी प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत रु.११.९१ कोटी एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता. सदर निधीमधून आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव सादर केलेल्या व सूक्ष्म सिंचन संचाची उभारणी केलेल्या ३८५३ शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर अनुदानाची रक्कम रु.७.१४ कोटी जमा करण्यात आली आहे. उर्वरीत शिल्लक निधी रु.४.७७ कोटी सन २०१७-१८ या वर्षातील प्रकरणांसाठी खर्च करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### दौंड (जि.ठाणे) तालुक्यातील पुनर्वसन गावठानांना नागरी सुविधा पुरवण्याबाबत

**(११) ७९६३७ (१३-०४-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यातील पुनर्वसित गावठाणामध्ये मुलभूत सोईसुविधा पुरवण्यात विलंब होत असल्याने तेथील नागरिकांची गैरसोय होत असल्याची मागणी अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) याबाबत, मा.लोकप्रतीनिधिंनी अनेक वेळा मागणी करून देखील सुविधा पुरवण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सुविधा पुरविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-०३-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

दौंड तालुक्यामध्ये वीर बाजी पासलकर, पानशेत, उजनी व वीर प्रकल्पांतर्गत एकूण ४३ पुनर्वसित गावे आहेत. पुनर्वसन अधिनियमानुसार देय १८ नागरी सुविधांपैकी ९ सुविधा बांधकामाधिन आहेत. त्यानुसार, सदर ४३ गावांमध्ये एकूण ३८७ नागरी सुविधा देय आहेत. सदर सुविधापैकी २७८ सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. उर्वरीत १०९ नागरी सुविधांपैकी ३९ नागरी सुविधा जिल्हापरिषदेकडून पुरविण्यात आल्या आहेत तर ४३ सुविधा शेती पोहोच रस्त्यांच्या असल्याने प्रकल्पग्रस्तांच्या मागणीनुसार पुरवावयाच्या आहेत. ८ नागरी सुविधांना शासन स्तरावरुन प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून, १९ नागरी सुविधांची अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बुलढाणा जिल्हयातील सुशिक्षीत बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्याबाबत

**(१२) ८५६४९ (०४-०९-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयात १ लक्ष २५ हजार सुशिक्षीत बेरोजगारांनी सहाय्यक संचालक, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रात नोंदणी केली असल्याची बाब दिनांक १५ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुलढाणा जिल्हयातील उद्योगधंद्यांचा अभावी वाढती बेरोजगारी यामुळे नोंदणीकृत सुशिक्षीत बेरोजगारांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व तद्नुसार बुलढाणा जिल्ह्यात १ लक्ष २५ हजार सुशिक्षीत बेरोजगारांना उद्योगधंदे व रोजगार उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०१-०३-२०१८) :** (१) हे खरे नाही.

तथापि, सहाय्यक संचालक, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र बुलढाणा या कार्यालयांतर्गत निरंतर चालणाऱ्या नोंदणी प्रकीयेनुसार एप्रिल, २०१७ अखेर नोंदणीपटानुसार १,१५,६९५ इतक्या बेरोजगारांची नोंदणी करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळावा म्हणून कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे संगणकीकरण, ग्रंथालय सदृश्य अभ्यासिका, बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्था स्थापन करणे, आदिवासी उमेदवारांसाठी कौशल्य विकास, रोजगार माहिती व मार्गदर्शन प्रशिक्षण केंद्र, रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम, व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र, प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान तसेच पंतप्रधान रोजगार निर्मिती योजना, सुधारित बीज भांडवल योजना व जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना या योजना राबविण्यात येतात

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्हयातील शेतक-यांना कृषीपयोगी साहित्याचे अनुदान मिळाले नसल्याबाबत**

**(१३) ८६१२३ (१५-०८-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यात कृषी उपयोगी साधन-साहित्य आणि अवजारांच्या खरेदीकरीता शेतकऱ्यांच्या बँक खात्यात मागील वर्षी सन २०१६-१७ मध्ये अनुदानाची रक्कम जमा होणे अपेक्षित असतांना कृषी विभागाच्या विलंबामुळे अनुदान जमा झाले नसल्याचे वृत्त माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयातील शेतकऱ्यांना राज्य शासनाच्या कृषी विभागातर्फे ठिबक व तुषार सिंचनासह ट्रॅक्टर, पॉवर टिलर, शेतीपयोगी विविध साहित्यांच्या खरेदीवर शेतक-यांना अनुदान दिल्या जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या विविध साहित्यांच्या खरेदीकरीता कृषी विभागाची पुर्वसंमती घेऊन शेतकऱ्यांना स्वतःच खरेदी करावे लागत असुन त्यानंतर साहित्याच्या खरेदी बिलासह कृषी विभागाकडे अनुदानासाठी प्रस्ताव सादर केल्यानंतर २० दिवसात शेतक-यांच्या बँकेच्या खात्यात अनुदान जमा होणे अपेक्षित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती शेतक-यांच्या बँकेच्या खात्यात अनुदान जमा करण्यास विलंब करणा-या कृषी विभागाच्या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१९-०३-२०१८) :** (१) कृषी यांत्रिकीकरण उप-अभियानांतर्गत कृषी साहित्याच्या अनुदानाचे वाटप विहीत कालावधीत करण्यात आले आहे.
(२) होय.
(३) होय.
(४) शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर अनुदानाची रक्कम विहीत कालावधीत जमा करण्यात आली असल्याने अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकणामध्ये स्वच्छता अभियान योजनेंतर्गत सार्वजनिक शौचालयाच्या बांधकाम करण्यास स्थानिक स्वराज्य संस्थांना मान्यता देणेबाबत**

**(१४) ८८१८० (२१-०८-२०१७). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे, पालघर या जिल्ह्यात स्वच्छता अभियान योजनेंतर्गत समुद्रकिनारी स्थानिक स्वराज्य संस्थेला सीआरझेड क्षेत्रामध्ये पर्यटक व नागरिकांसाठी सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम करावयाचे असल्यास स्थानिक स्वराज्य संस्थेच्या व्यतिरिक्त शासनस्तरावर अडचणी निर्माण होतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शौचालय बांधकाम करण्यास परवानगी नाकारल्यास नागरीकांची व पर्यटकांच्या सुविधांबाबत गैरसोय होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार पर्यटक व नागरिकांना शासनाचे धोरणानुसार मुलभूत सुविधा उपलब्ध करण्यासाठी शासनस्तरावर स्थानिक स्वराज्य संस्थांना मान्यता देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२२-०३-२०१८) :** (१), (२) व (३) केंद्र शासनाने जाहीर केलेल्या सिआरझेड अधिसूचना, २०११ च्या तरतूदींनुसार सिआरझेड क्षेत्रातील बांधकामांना महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ऑथोरिटीची पूर्व परवानगी आवश्यक आहे. तथापि, सिआरझेड-२ क्षेत्रातील सार्वजनिक शौचालय बांधकामांना महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ऑथोरिटीच्या पूर्व परवानगीची आवश्यकता नसून, असे प्रस्ताव स्थानिक पातळीवरच मंजूर करण्याबाबतचा धोरणात्मक नियम महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ऑथोरिटीच्या बैठकीत घेण्यात आला

आहे. परंतु, सिआरझेड-१ क्षेत्रातील सार्वजनिक शौचालयाचे प्रस्तावांस महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ऑथोरिटीची पूर्व परवानगी आवश्यक आहे. सदर प्रस्ताव महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ऑथोरिटीच्या बैठकीत निर्णयार्थ ठेवण्यात येतात.

महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ऑथोरिटीच्या दिनांक१९.१२.२०१५ (१०९वी), दिनांक ०८ व ११.०८.२०१६ (११३ वी) व दिनांक २३.०३.२०१७ (११६वी) रोजीच्या बैठकीत रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्हयांतील सार्वजनिक शौचालयांच्या प्रस्तावांना सीआरझेड पूर्व परवानगी देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात औषधी दुकानांमध्ये उपलब्ध असलेल्या कोडलीन सिरप, नायट्राव्हॅट १० एमजी, स्पॅसमो प्रोव्झाव्होन , लिमोटील या औषधांचा नशेसाठी वापर केला जात असल्याबाबत**

**(१५) ९११३४ (२१-०८-२०१७). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात औषधी दुकानांमध्ये उपलब्ध असलेल्या कोडलीन सिरप, नायट्राव्हॅट १० एमजी, स्पॅसमो प्रोव्झाव्होन, लिमोटील या औषधांचा नशा करण्यासाठी वापर केला जात असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, सदरहू गोळ्यांचे वारंवार सेवन केल्याने मानवी शरीरावर विपरित परिणाम होत असून किडनी खराब होणे, शारिरिक व्यंगत्व येणे आदि आजार उद्‌भवत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच शासनाने बंद केलेल्या गर्भपाताच्या एमटीपी गोळ्याही काळ्या बाजारात दुप्पट किंमतीत विकल्या जात असल्याप्रकरणी अन्न्न व औषधी प्रशासन दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२२-०३-२०१८) :** (१) कोलडीन सिरप, नायट्राव्हॅट १० एमजी, स्पॅसमो प्रोव्झाव्होन लिमोटील या औषधांचा नशा करण्यासाठी वापर केला जात असल्याचे निश्चितपणे सांगता येत नाही.

मात्र राज्यात काही ठिकाणी सदर औषधांचा खरेदी विक्री अभिलेखामध्ये तफावत असल्याचे प्रकरण व अशा औषधांची विक्री करण्यासाठी विना परवाना साठा केल्याची प्रकरणे उघडकीस आली आहेत.

(२) डॉक्टरांच्या सल्ल्याविना औषध घेतल्यास किंवा वारंवार सेवन केल्यास मानवी शरीरावर विशेषत: किडणीवर दुष्परीणाम होण्याची शक्यता असते.

(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**संगमेश्वर (जि.रत्नागिरी) औद्योगिक प्रशिक्षण केंद्राच्या नवीन इमारतीत औद्योगिक प्रशिक्षण केंद्र स्थलांतरीत न झाल्याबाबत**

**(१६) ९१६०८ (०४-०९-२०१७). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) औद्योगिक प्रशिक्षण केंद्राची नवीन इमारत बांधून पूर्ण झालेली असतांनाही सदर औद्योगिक प्रशिक्षण केंद्राचे स्थलांतर करण्यास विलंब होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी वारंवार मागणी होऊनही अद्याप स्थलांतर न करणेची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर इमारत स्थलांतराबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०१-०३-२०१८) :** (१), (२), (३) व (४) औद्योगिक प्रशिक्षण संस्था,संगमेश्वर या संस्थेच्या इमारतीचे स्थापत्य बांधकाम पूर्ण झालेले आहे. तथापि दिनांक २१.०६.२०१७ रोजी संचालनालयामार्फत औद्योगिक प्रशिक्षण संस्था,संगमेश्वर या संस्थांच्या बांधकामाची प्रत्यक्ष पाहणी केली असता, मूळ अंदाजपत्रकात नमूद कामे व प्रत्यक्षात करण्यात आलेली पाण्याची व्यवस्था प्लंबिंग,ड्रेनेज, सांडपाण्याची व्यवस्था, विद्युत जोडणी, सुरक्षाभिंत, प्लिंथ प्रोटेक्शन, रेन वॉटर हार्वेस्टिंग व्यवस्था, तसेच अंतर्गत रस्ते, दरवाजे,प्लोअरिंग, इमारतीकरिता वाळवी प्रतिबंधक उपाययोजना इत्यादी कामे मूळ अंदाजपत्रकात नमूद करण्यात आल्याप्रमाणे पूर्ण झालेले नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे, सदर इमारत ताब्यात घेण्यात आलेली नाही.सदरची कामे मूळ अंदाजपत्रकात नमूद करण्यात आल्यानुसार पूर्ण करून देण्याच्या अनुषंगाने व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत सार्वजनिक बांधाकाम विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

**प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत नगर जिल्हयातील सुमारे ११ हजार लाभार्थी कुटुंबाकडे घर बांधण्याकरिता स्वतःची जागा नसल्याबाबत**

**(१७) ९२६११ (०४-०९-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत नगर जिल्हयातील सुमारे ११ हजार लाभार्थी कुटुंबाकडे घर बांधण्याकरिता स्वतःची जागा नसल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२२-०३-२०१८) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेतील (शहरी) ४ घटकांतर्गत अहमदनगर जिल्ह्यातून २४,८३१ अर्ज केंद्र शासनाच्या PMAY-MIS पोर्टलवर करण्यात आले आहे. तसेच अहमदनगर महानगरपालिका हद्दीमधून ११,०८४ अर्जदारांनी कागदपत्रांची पूर्तता केली आहे. त्यापैकी भागीदारी तत्वावर परवडणारी घरे या घटकांतर्गत ८,७०० अर्ज प्राप्त झाले आहेत.

(२) अहमदनगर महानगरपालिकेचा प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत सविस्तर प्रकल्प अहवाल सुकाणू अभिकरण म्हणून म्हाडामार्फत शासनास प्राप्त झाल्यास, त्याची शासनाच्या SLAC समितीमार्फत पडताळणी करुन, मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली SLSMC समितीच्या मान्यतेकरिता सादर करण्यात येऊन प्रस्ताव CSMC च्या मान्यतेकरिता नवी दिल्ली येथे पाठविण्यात येतात.

प्रधानमंत्री आवास योजनेसाठी शासकीय जमीन रु.१/प्रति.चौ.मी. दराने संबंधित अंमलबजावणी यंत्रणांना उपलब्ध करुन देण्याबाबत महसूल विभागाने दि.१९.९.२०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. तसेच सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP) तत्वावरील प्रकल्पांची अंमलबजावणी करण्याकरिता दि.११.०१.२०१८ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. तसेच दि.२४ जानेवारी,२०१८ रोजी शासन परिपत्रक निर्गमित करण्यात आला आहे. या शासननिर्णयानुसार/परिपत्रकानुसार खाजगी विकासकांमार्फत परवडणाऱ्या घरांची निर्मिती होणे अभिप्रेत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-ठाकूर्ली (जि.ठाणे)येथील चोळे गावात प्लास्टिकसदृश तांदूळाची होत असलेली विक्री**

**(१८) ९५३५९ (२९-१२-२०१७). अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-ठाकूर्ली (जि.ठाणे) येथील चोळे गावात राहणा-या एका नागरिकाने एका दुकानातून विकत घेतलेले तांदूळ प्लास्टिकसदृश असल्याची माहिती दिनांक २८ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी नागरिकाने अन्न व औषध प्रशासनाच्या ठाणे कार्यालयात तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर तांदळाचे नमुने व संबंधित दुकानातूनही या तांदळाचे नमुने घेऊन ते प्रयोग शाळेत पाठविण्यात आले आहे काय व त्याबाबतचा अहवाल प्रयोग शाळेने सादर केला आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार प्लास्टिकसदृश तांदूळ विकणा-या दुकानांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२२-०३-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
सदर तक्रारदाराने अन्न सुरक्षा अधिकारी, ठाणे यांचेकडे भ्रमणध्वनीवर तक्रार केली होती.
(३) अन्न सुरक्षा मानके कायदा, २००६ अंतर्गत संबधित तांदळाचे नमुने घेऊन ते प्रयोगशाळेत विश्लेषणासाठी पाठविण्यात आले आहेत.
(४) अन्न विश्लेषक, अन्न चाचणी प्रयोगशाळा, मुंबई यांनी सदर तांदळाचे दोन्ही नमुने प्रमाणित घोषित केले आहेत
सदरचा तांदुळ प्लॅस्टिकसदृश्य नसल्याने संबधित दुकानावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## हाफकिन महामंडळामध्ये झालेल्या बेकायदेशीर नियुक्त्यांबाबत

**(१९) ९७९२९ (२९-१२-२०१७). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हाफकिन महामंडळामध्ये गत अनेक वर्षापासून कोणतीही जाहिरात न देता, कोणत्याही मुलाखती न घेता, संचालक मंडळाने मान्यता देऊन अनेक बेकायदेशीर नेमणूका केल्याची बाब आरटीआय कार्यकर्ते चंद्रकांत कदम यांनी दिनांक २४ सप्टेंबर २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आणली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त महामंडळात १३ व्यक्तींची सन २०१५ मध्ये संयत्र अभियंता, पशुवैद्यकीय अधिकारी, स्नेकमॅन, मॅनेजर मेटेरियल, ज्यूनीयर प्रोग्रामर, मॅनेजर अकाऊंटंट, लायझनिंग अधिकारी इ. महत्त्वाच्या पदांवर हंगामी नियुक्ती करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बेकायदा नेमणूका तातडीने रद्द करण्याबाबत मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांना लेखी निवेदने दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व हाफकिन महामंडळात झालेल्या बेकायदेशीर नियुक्त्यांबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२२-०३-२०१८) :** (१) श्री.चंद्रकांत कदम यांनी दि.०१/०७/२०१७ रोजीच्या पत्रान्वये यासंदर्भात तक्रार केलेली आहे.

(२) संयंत्र अभियंता, पशुवैद्यकीय अधिकारी यांच्या नियुक्त्या रितसर जाहिरात देवून करण्यात आल्या आहेत व अन्य नियुक्त्या संचालक मंडळाच्या अनुमतीने करण्यात आलेल्या आहे.

(३) होय.

(४) दि.३०/१०/२०१७ च्या शासन आदेशान्वये चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे. सदर चौकशी समिती हाफकिन महामंडळामध्ये प्रत्यक्ष भेट देऊन हाफकिन महामंडळातील लेखापरीक्षण व्यवहारात आढळून आलेल्या त्रुटी तसेच, हाफकिन महामंडळाने घेतलेल्या निर्णयांची पडताळणी करण्याच्या अनुषंगाने मूळ कागदपत्रांची तपासणी करून आपला अहवाल शासनास सादर करणार आहे.

(५) लागू नाही.

---

### नाशिक जिल्ह्यातील देवळाली गावात गुंडांचे प्रमाण वाढल्याबाबत

**(२०) ९८३५० (०६-०१-२०१८). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील देवळाली गावात कुस्ती मैदान, सोमवार बाजारतळ, धनगर गल्ली, विठोबा मंदिर, राममंदिर चावडी चौक, दक्षिणमुखी मारूती मंदिराच्या आवारात टवाळखोर गुंड यांचे राज्य असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक नागरिकांनी वारंवार स्थानिक पोलीस स्थानकांत तक्रार दाखल करून पोलिसांकडूनही कोणतीच कारवाई होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने शासनाने अद्यापपर्यंत किती जणांवर कारवाई तसेच गुंडगिरी कमी करण्याकरिता उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) स्थानिक नागरीकांकडून तक्रार प्राप्त झाल्यास संबधितांविरुध्द त्वरीत प्रचलित कायद्याप्रमाणे कायदेशीर कार्यवाही केली जाते.

उपनगर पोलस ठाणे, नाशिक शहर कडून दररोज पोलीस ठाणे हद्दीत देवळाली गावात कुस्ती मैदान, सोमवार बाजारतळ, धनगर गल्ली, विठोबा मंदीर, राम मंदीर चावडी चौक, दक्षिणमुखी मारुती मंदिर व परीसरात पेट्रोलींग केले जाते.

सन २०१७ मध्ये सदर भागात महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ११२/११७ प्रमाणे १४१४ केसेस दाखल केल्या आहेत. टवाळखोर, गुंड यांचे विरुध्द सतत प्रतिबंधात्मक कार्यवाही उपाययोजना करण्यात येते.

उपनगर पोलीस ठाणे मार्फत पिटर मोबाईल पेट्रोलींग करण्यात येते. तसेच गुप्त बातमीदारांमार्फत माहिती काढुन टवाळखोर तसेच गुंड प्रवृत्तीच्या लोकांविरुध्द प्रचलित कायद्याप्रमाणे कारवाई करण्यात येते.

(५) विलंब झालेला नाही.

---

**यवतमाळ जिह्यात शासनाच्या कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत**
**मोठ्या प्रमाणावर अपहार झाल्याबाबत**

**(२१) ९९२४६ (०६-०१-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात शासनाच्या कौशल्य विकास कार्यक्रमातंर्गत ब्युटीपार्लर प्रशिक्षणावर एकुण २८ लाख रुपये खर्च केले गेल्याचा गंभीर प्रकार माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रशिक्षणासाठी निविदेविना पुण्याच्या एका संस्थेला कंत्राट देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामध्ये मोठ्या प्रमाणात अपहार झाला असल्याचा आरोप होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले वा तद्नुसार उक्त कार्यक्रमात अपहार करणा-या संबंधीत अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१४-०२-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३), (४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोकर (जि.नांदेड) येथे अन्न व औषध प्रशासन विभागाचे कार्यालय बंद ठेवून येथील निरिक्षक व्यापा-यांकडून लाच घेत असल्याबाबत**

**(२२) ९९३७६ (२९-१२-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोकर (जि.नांदेड) येथे अन्न व औषध प्रशासन विभागाचे कार्यालय बंद ठेवून येथील निरिक्षक केवळ महिन्याला कर्तव्य बजावत असल्याचे सांगून काही व्यापा-यांकडून लाच घेत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर निरिक्षकांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२२-०३-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला शहरातील पातूर रोडवरील अमरदिप धाब्यावर मुख्याध्यापक, शिक्षकासह २१ विद्यार्थ्यांना अंमली पदार्थाचे सेवन करीत असतांना पकडल्याची घटना**

**(२३) ९९४४८ (०६-०१-२०१८). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला शहरातील पातूर रोडवरील अमरदीप धाब्यावर, मुख्याध्यापक, शिक्षक यांच्यासह २१ विद्यार्थी अमंली पदार्थांचे सेवन करीत असताना पकडल्याची घटना माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, मुख्याध्यापक व शिक्षक विद्यार्थ्यांसोबत अंमली पदार्थाचे सेवन करीत असल्याने सदर मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.
सदरील घटना दिनांक १०.९.२०१७ रोजी घडली आहे. तथापि, सदर घटनेत २१ गैर अर्जदार यांचेपैकी १० शिक्षक आहेत.
(२) होय.
(३) हॉटेल मालक व इतर २० गैर अर्जदार यांच्याविरुध्द पोलीस स्टेशन जुने शहर, अकोला येथे अदखलपात्र गु.क्र.६४९/२०१७ कलम ३३ (डब्ल्यू)/१३१ म. पो. अधि.सह कलम ४,२१

सिगारेट ॲन्ड टोबॅको प्रोडक्स ॲक्ट सन २००३ प्रमाणे दि.१०.९.२०१७ चे ०७.५६ वा. नोंद करण्यात आला आहे. दारुचे सेवन करण्यात आले असल्याचे वैद्यकीय अहवालात नमूद असल्याने ६ शिक्षकांविरुध्द अप.क्र.२४६/२०१७ कलम ८५ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, प्रमाणे पोलीस स्टेशन जुने शहर, अकोला येथील दि.१०.९.२०१७ चे १४.२५ वा. गुन्हा नोंदविण्यात आला आहे. गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

अमरदीप हॉटेल मालक -मोहमंद मुब्तबीर शेख बशीर यांनी वि. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे क्रि.रिट पिटीशन क्र.९ ८४/१७ अन्वये दाखल केले आहे. त्यावर दिनांक १३.१०.२०१७ रोजी वि. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी अमरदीप हॉटेल मालक यांचेवर पुढील आदेशापर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात येवू नये असे आदेशित केले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे येथील वात्सल्य रुग्णालयात काचेच्या पेटी (इनक्युबेटर) ला लागलेल्या आगीने नवजात अर्भकाचा झालेला मृत्यू

**(२४) ९९६५८ (०६-०१-२०१८). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील वात्सल्य रुग्णालयात काचेच्या पेटी (इनक्युबेटर) ला आग लागल्याने गंभीर जखमी झालेल्या नवजात अर्भकाचा दिनांक २८ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुसार दोषी आढळणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०२-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) दिनांक २६/०९/२०१७ रोजी जन्मलेल्या नवजात बालकास श्वसनाचा त्रास जाणवत असल्याने त्यास लेबर रुम मधील वॉर्मर पेटीमध्ये ऑक्सीजनवर ठेवण्यात आले होते. त्यानंतर काही वेळातच तेथे स्फोट झाल्याचा आवाज होऊन धूर झाला. डॉक्टरांनी ताबडतोब वॉर्मरमधील बाळाला उचलून दूसऱ्या हॉस्पीटलमध्ये उपचारार्थ घेवून गेले. परंतू बाळास गंभीर इजा झाल्याने त्यास तेथून पुढील उपचारार्थ ससून हॉस्पीटलमध्ये पाठविण्यात आले. तेथे दिनांक २८/०९/२०१७ रोजी सदर बाळ मयत झाले. Death due to shock due to burns असा वैद्यकीय अहवालाचा निकर्ष आहे.

याप्रकरणी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून दिनांक २६.०९.२०१७ रोजी विश्रामबाग पोलीस स्टेशन येथे वात्सल्य हॉस्पीटलचे डॉ.गौरव चोपडे यांच्याविरुध्द गु.र.क्र.४४२/२०१७, भा.दं.वि.क.२८७, ३३८, ३०४ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयाच्या पुराव्याकामी घटनास्थळावरुन इनक्युबेटर जप्त करण्यात आले असून इतर साक्षीदाराचे जबाब

नोंदविण्यात आले आहेत. आरोपीस दिनांक २९/०९/२०१७ रोजी अटक करण्यात आली असून त्यास दिनांक २९/०९/२०१७ ते ११/१०/२०१७ पर्यंत न्यायालयीन कोठडी देण्यात आलेली होती. आरोपी सध्या जामीनावर आहे.

वात्सल्य रुग्णालय हे पुणे शहरातील खाजगी रुग्णालय असून त्याची मुंबई नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट, १९४९ अंतर्गत पुणे महानगर पालिकेकडून नोंदणी करण्यात आलेली आहे. नर्सिंग होम चालविण्याकरिता आवश्यक असणाऱ्या बाबींची पूर्तता सदर हॉस्पीटलने केलेली आहे. या प्रकरणी पुणे महानगरपालिकेमार्फत हॉस्पीटलला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे. महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून सदर हॉस्पीटलला दिनांक २७/०९/२०१७ पासून पुढील आदेशापर्यंत कोणत्याही नविन रुग्णास दाखल करुन घेवू नये तसेच त्यास उपचार देऊ नये असे कळविण्यात आले होते. या प्रकरणी गुन्हा प्रलंबित असल्याने या गुन्हयाबाबत अंतिम कार्यवाही होईपर्यंत ज्या अर्भकांना इनक्युबेटरची गरज आहे अशांना रुग्णालयात दाखल करुन घेतले जाणार नाही या आदेशास अधिन राहून नव्याने रुग्ण भरती करण्यास दिनांक २७/१०/२०१७ पासून परवानगी देण्यात आलेली आहे.

गुन्हयाचा तपास चालु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आडगाव (जि.नाशिक) येथे पोलीस कर्मचा-यांसाठी बांधण्यात आलेल्या घरांचा ताबा लवकर मिळण्याबाबत**

**(२५) १०००३२ (०६-०१-२०१८). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आडगाव (जि.नाशिक) येथे पोलीस कर्मचारी यांना घर मिळावे म्हणून पोलीस महासंचालक मिलींद भारंबे यांच्या अध्यक्षतेखाली बांधण्यात आलेली घरे सन २०१२ पर्यंत ताबा देणे आवश्यक असतांना अद्यापही ताबा देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस महासंचालक मिलींद भारंबे हे अध्यक्ष असल्यामुळे पोलीस मोफ्फा कायद्यान्वये गुन्हा नोंदवित नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलीस कर्मचारी यांना घरांचा ताबा मिळावा व दोषींवर कारवाई व्हावी म्हणून शासनाद्वारे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०२-२०१८) :** (१), (२) व (३) नाशिक पोलीस सहकारी गृहनिर्माण सोसायटी मर्यादित, आडगाव, जिल्हा नाशिक ही दिनांक ३०/०४/२०११ रोजी स्थापन करण्यात आली असून विकसन कराराप्रमाणे विकासकाने आठ इमारतींचे बांधकाम करुन सोसायटीस हस्तांतरण केले आहे. ज्या सभासदांनी सदनिकेचे आवश्यक शुल्क देणे असलेल्या रकमेची पूर्तता व भरणा केली आहे, त्यांना सदनिकेचा ताबा देण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई उपनगरातील मालाड येथे फेरीवाल्यांनी एका राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याला जबर मारहाण केल्याचे प्रकरण**

**(२६) १००१६१ (०६-०१-२०१८). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील मालाड येथे दिनांक २७ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास फेरीवाल्यांनी एका राजकीय पक्षाच्या पदाधिका-याला जबर मारहाण केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी स्थानिक पोलिस स्थानकांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी अद्यापपर्यंत किती जणांवर कोणत्या कलमान्वये कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) सदर प्रकरणी १४ आरोपींविरुध्द मालाड पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.४५४/२०१७ भा.दं.वि. कलम ३०७, ३२६, ३२४, ५०४, ५०६(२), १४१, १४२, १४३, १४४, १४७, १४८, १४९ अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर प्रकरणी १४ आरोपींना अटक करण्यात आली असून सध्या ते न्यायालयीन कोठडीत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बेरोजगार तरूणांची फसवणूक केल्याप्रकरणी बोरीवली, मुंबई पोलिस स्थानकांत तक्रार दाखल केल्याबाबत**

**(२७) १००१६५ (०६-०१-२०१८). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बँकेमध्ये चांगल्या पगाराची नोकरी मिळवून देण्याचे प्रलोभन दाखवून सुमारे साडेसहा लाख रूपये घेऊन बेरोजगार तरूणांची फसवणूक झाल्याची तक्रार दिनांक १६ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास बोरीवली, मुंबई या पोलीस स्थानकांत नोंदविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुसार अद्यापपर्यंत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) होय, सदर प्रकरणी आरोपींनी फिर्यादीला आर.बी.आय. बँकेमध्ये नोकरीस लावण्याचे आमीष दाखवुन बनावट दस्तऐवज तयार करुन रु. ४१,८०,४७५/- इतकी रक्कम स्विकारुन फिर्यादीची फसवणुक केल्याने बोरीवली पोलीस स्टेशन, मुंबई येथे गु.र.क्र. ६३६/२०१७, भा. दं. वि. कलम ४६५, ४६८, ४७१, ४२०, ५०६, ३४ सह कलम ६६ (ड) माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० अन्वये २ आरोपीविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नमुद गुन्ह्यातील आरोपीस अटक करुन त्यांचेविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असुन सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीच्या जमिनी रेडीरेकनर दराने विकण्याच्या निर्णयाबाबत**

**(२८) १००२५४ (०६-०१-२०१८). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पश्चिम महाराष्ट्र देवस्थान संस्थानच्या जमिनी पूर्वापार कुळांना कसण्यासाठी दिल्या अशा सुमारे २६ हजार हेक्टर जमिनी असून जमिनीचे लेखा परीक्षण करुन त्यांचे विनियोजन करण्याचा आराखडा करण्याचे काम माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान सुरु करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीच्या जमिनी रेडीरेकनर दराने विकण्याचे धोरण विधी व न्याय राज्यमंत्री यांच्या धोरणाला कोल्हापूर शहरातील भक्त संघटनानी विरोध केल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, या धोरणाला विरोध करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाची भुमिका काय आहे व तदनुसार याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०२-२०१८) :** (१) देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर च्या जमिनीचे रेकॉर्ड अद्यावत करण्याकामी ऑनलाईन साईट (महा भूमी लेख) वरुन ७/१२ च्या संकलनाचे काम चालू आहे व त्या अनुषंगाने या नोंदी अद्यावतीकरण करणे त्यांचे सोबत लेखापरीक्षणासाठी माहिती संकलन करणे सुरु आहे.
(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धर्मादाय सहआयुक्त कार्यालयातर्फे विशेष मोहिमेअंतर्गत नोंदणी केलेल्या न्यास, संस्था, मंडळानी पाच वर्षात एकदाही लेखापरिक्षणासह अन्य माहितीचे कार्यालयाकडे सादरीकरण न केल्याबाबत**

**(२९) १००२५६ (०६-०१-२०१८). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धर्मादाय सहआयुक्त कार्यालयातर्फे दिनांक १ ऑक्टोंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत विशेष मोहिमेअंतर्गत नोंदणी केलेल्या न्यास, संस्था, मंडळानी पाच वर्षात एकदाही लेखापरिक्षणांसह अन्य माहितीचे कार्यालयाकडे सादरीकरण केलेले नाही, अशांची नोंदणी रद्द करण्याचा निर्णय माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयानुसार अद्यापपर्यंत जिल्ह्यातील किती संस्थांवर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, केलेल्या कारवाईचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) महाराष्ट्रातील एकूण अंदाजित ८० हजार संस्थांवर कारवाई करण्यात आलेली आहे. सुधारित कायद्यांतर्गत ज्या न्यासांनी ५ वर्षात एकदाही लेखापरीक्षणासह अन्य माहितीचे धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे सादरीकरण केलेले नाही, अशा न्यासांची नोंदणी रद्द करण्याची प्रक्रिया करण्यात येत आहे.

(३) ज्या संस्था कार्यक्षम आहेत, त्यांना हिशोबपत्रके व बदल अर्ज सादर करण्यासाठी विलंब माफीचा अर्ज घेऊन दाखल करण्याकरिता संधी दिली जाते.

हिशोबपत्रके व बदल अर्ज सादर न करणाऱ्या निष्क्रिय संस्थांची नोंदणी रद्द करण्याबाबतची प्राथमिक न्यासांची यादी धर्मादाय संघटनेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहेत. त्यांना नियमानुसार ३० दिवसांची पुरेशी व वाजवी संधी देऊन तद्नंतरच पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुण्यातील सहा हजारांहून अधिक वकीलांनी बार कौन्सिलकडे पाठविलेल्या माहितीची पडताळणी करण्यासाठी मुदतवाढ देण्याबाबत**

**(३०) १००२९५ (०६-०१-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील सहा हजारांहून अधिक वकीलांनी बार कौन्सिलकडे पाठविलेल्या माहितीपैकी दीड हजार जणांच्या माहितीमध्ये त्रुटी आढळून आल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कागदपत्रांची पडताळणीची मुदत एक दिवसच देण्यात आली असल्याने एका दिवसात दीड हजार वकिलांच्या कागदपत्रांची पडताळणी होणे शक्य नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या कागदपत्रांच्या पडताळणीकरिता मुदतवाढ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०१-२०१८) :** (१) पुणे जिल्ह्यातून ८०२७ आवेदनपत्र व्हेरिफिकेश्न करिता प्राप्त झाले होते. त्यापैकी १४०४ आवेदनपत्रामध्ये त्रुटी आढळून आल्या होत्या, त्यानंतर ७५४ आवेदकांनी त्रुटी विहित मुदतीत पूर्ण केल्या व ६५० आवेदकांचे आवेदनपत्र त्रुटीयुक्त राहिलेत ते मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अस्विकृत करण्यात आले.
(२) आवेदनपत्रातील त्रुटी दुरुस्ती करण्याकरिता दिनांक २९.०८.२०१७ रोजी मराठी व इंग्रजी या दोन वर्तमानपत्रामध्ये सूचना प्रसिध्द करण्यात आली व दिनांक १३.०९.२०१७ पर्यंत त्रुटी पुर्ण करण्याबाबत वकीलांना कळविण्यात आले त्यामुळे कागदपत्रांच्या पडताळणीस एक दिवस देण्यात आला ही बाब पूर्णत: चुकीची आहे.
(३) कागदपत्रांच्या पडताळणीकरिता मुदतवाढ देण्याबाबत मा. सर्वोच्च न्यायालय येथे याचिका TRANSFERRED CASE (CIVIL) NO.१२६ OF २०१५ Ajayinder Sangwan and Ors. V/s Bar Council of Delhi प्रलंबित आहे. सर्वोच्च न्यायालय जे जे निर्देश देईल त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल. मुदतवाढ देण्याबाबत बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा यांच्याकडे कोणतेही अधिकार नाहीत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्याच्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत**

**(३१) १००३०१ (२६-१२-२०१७). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय कामाचा आठवडा ६ दिवसांऐवजी ५ दिवसांचा करण्यात यावा अशी मागणी महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघासह अन्य कर्मचारी संघटनांनी राज्य शासनाकडे केली असल्याची बाब माहे जुन, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सोमवार ते शुक्रवार असा ५ दिवसांचा कामाचा आठवडा करताना कामाच्या ५ दिवसांमध्ये दररोज ४५ मिनिटांची वाढ करुन १ दिवसाची भरपाई करण्याला कर्मचारी संघटनांनी अनुकूलता दर्शविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वरुन ६० वर्ष करणे, महिलांना दोन वर्षे बालसंगोपन रजा देणे, सरकारी सेवेत असलेल्या पती-पत्नींना एकाच ठिकाणी बदली देण्यासाठी १ वर्ष थांबविण्याची सध्याची अट शिथिल करणे या अन्य मागण्या देखील कर्मचारी संघटनांनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्याच्या मुख्य सचिवांनी या संदर्भात बैठक घेऊन राज्य मंत्रिमंडळापुढे अहवाल सादर करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०१८) :** (१) व (२) होय.
(३) व (४) सेवानिवृत्तीचे वयोमर्यादेसंदर्भात श्री.बी.सी.खटुवा यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. तसेच कर्मचा-यांच्या उर्वरित मागण्यांवरही कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोकप्रतिनिधींच्या पत्रांना विहित कालावधीत पोच देणे व दोन महिन्याचे आत अंतीम उत्तर देणेबाबत**

**(३२) १००४२९ (०६-०१-२०१८). श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासन परिपत्रक क्रमांक विमंस-२०१३/प्र.क्र.६७/१८ (र.व का.) दिनांक २७ जुलै, २०१५ च्या कलम ४ व ५ अन्वये लोकप्रतिनिधींच्या पत्रांना विहित कालावधीत पोच देणे व दोन महिन्याचे आत अंतिम उत्तर देणे तसेच विहीत नमुन्यात नोंदवही / संगणकीय नोंद ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मुख्य सचिवांना पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अद्यापही अशा प्रकारे कार्यवाही केली जात नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अशा प्रकारे विहित कालावधीत पोच न देणे, अंतरीम व अंतीम उत्तर न देणे तसेच या परिपत्रकाच्या कलम ५ मधील तरतुदीनुसार विविक्षीत नमुन्यात नोंदवह्या न ठेवणे यासाठी अद्यापपर्यंत किती अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशीची कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०१-२०१८) :** (१) होय.
(२) होय.
(३) व (४) दिनांक २७ जुलै, २०१५ च्या परिपत्रकामधील तरतूदींचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन वियभाग, क्रमांक:संकीर्ण २०१७/प्र.क्र. १७१/१८

(र. व का.) दिनांक २७ ऑक्टोबर, २०१७ अन्वये पुन्हा सर्व विभागांना सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार उचित कार्यवाही संबंधित प्रशासनिक विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांचेकडून केली जात आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात अखाद्य किंवा औद्योगिक बर्फाला निळा रंग देण्याच्या प्रस्तावाबाबत

**(३३) १००५८८ (२९-१२-२०१७). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अन्न व औषध प्रशासनाचे प्रमुख व बर्फ तयार करणा-या कंपन्या सोबत एफडीएने दिनांक ०९ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास घेतलेल्या बैठकीत अखाद्य किंवा औद्योगिक बर्फाला निळा रंग देण्याचा प्रस्ताव मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव मंजूरीसाठी राज्य शासनाकडे एफडीएच्या आयुक्तांनी पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्यानुषंगाने अंमलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२२-०३-२०१८) :** (१) हे खरे आहे.

दि.०४.१०.२०१७ रोजी आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांच्या अध्यक्षतेखाली सदर प्रकरणी बैठक घेण्यात आली. त्यामध्ये अखाद्य / औद्योगिक बर्फाला निळा रंग देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या मंजूरीस्तव सादर करण्याचा निर्णय घेतला असून सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोल्हापूर शहरातील महाविद्यालय परिसरात विद्यार्थ्यांच्या दुचाकी, मोबाईल, पर्स, सॅक चोरीला जात असल्याबाबत

**(३४) १००८१५ (०६-०१-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील महाविद्यालय परिसरात गत महिन्याभरापासून विद्यार्थ्यांच्या दुचाकी, मोबाईल, पर्स, सॅक चोरीला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या चोरी प्रकरणातील किती चोरांना आतापर्यंत अटक केली व त्यांचेवर कोणत्या कलमान्वये कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, अशा चो-यांना प्रतिबंध करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) सदर कालावधीत (गत महिना) कोल्हापूर शहरातील महाविद्यालय परिसरात गत महिन्याभरापासुन विद्यार्थीच्या दुचाकी, मोबाईल, पर्स, सॅक चोरीला गेलेबाबत कोल्हापुर शहरातील एकही पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल नसल्याने कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) कोल्हापूर शहरामध्ये पेट्रोलिंग नेमले असुन, वेळोवेळी महाविद्यालयीन शिक्षक व विद्यार्थी यांना भेटुन, त्याच्या वस्तु सुरक्षीत ठिकाणी ठेवणेबाबत आव्हान करण्यात आले आहे. पोलीस ठाणे कडील निर्भया पथक, दामीनी पथकातील पोलीस अधिकारी व कर्मचारी शाळा, कॉलेज, महाविद्यालये या ठिकाणी पेट्रोलिंग नेमण्यात आले असुन, कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत.
(४) विलंब झालेला नाही.

---

## राज्यातील विविध कारागृहांत जामीन होऊनही बंदिस्त असलेल्या ग्रामीण भागातील कैद्यांची रितसर सुटका करण्याबाबत

**(३५) १००८४८ (०६-०१-२०१८). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विविध कारागृहात जामीन मंजूर होऊन देखील बंदिस्त असलेल्या ७५० कच्च्या कैद्यांची रितसर सुटका करण्यासाठी कारागृह विभागानेच पुढाकार घेतला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हा उपक्रम सुरूवातीला मुंबई, ठाणे, नवी मुंबई येथे राबविण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हा उपक्रम राज्यातील ग्रामीण भागातील कैद्यांसाठी अधिक उपयुक्त ठरू शकतो, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील विविध कारागृहांत जामीन होऊनही बंदिस्त असलेल्या ग्रामीण भागातील कैद्यांना सदर उपक्रमाचा लाभ मिळावा यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०१८) :** (१) व (२) अंशत: खरे आहे,

सन्मा.उच्च न्यायालय याचिका क्र.४६/१५ सह १६७/१५ सह (९/१७) मध्ये दि. ०१.०३.२०१७ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार मा.उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश डॉ.राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली सर्वसमावेशक सुधारणा सुचिवणेसाठी समिती स्थापन

करण्यात आली आहे. राज्यातील विविध कारागृहात ७ वर्षाखालील कमाल शिक्षा होऊ शकते अशा बंद्याचे प्रकरणी जामीन मंजूर होऊन देखील बंदिस्त असलेल्या ५८९ बंदयाची माहिती समितीकडे सादर केली आहे.

सर्व कारागृहातील माहिती समितीस सादर केलेली असून टाटा ट्रस्ट व महाराष्ट्र राज्य यांचेकडील सामंजस्य करारानुसार जामीन मंजूर झालेल्या बंदयाचे जामीन पूर्ततेकामी योग्य ती मदत घेऊन सदर उपक्रम तळोजा, येरवडा, औरंगाबाद, नागपूर व नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहात राबविण्यात येत आहे.

(३) व (४) मा.सर्वोच्च न्यायालय रिट पिटीशन क्र.४०६/२०१३ मधील निर्देशानुसार न्यायाधीन बंदी पुनर्विलोकन समिती स्थापित झाली असून त्यांचेसमोर तीन महिन्यातून एकदा न्यायाधीन बंदयांची प्रकरणे मुक्ततेकरीता सादर करण्यात येत आहेत. तसेच सीआरपीसी ४३६ (A) अंतर्गत दाखल न्यायाधीन बंद्याचा देखील सदर समितीद्वारे आढावा घेण्यात येत आहे. सदर समितीमध्ये सत्र न्यायाधीश अध्यक्ष व जिल्हादंडाधिकारी, पोलीस आयुक्त/अधीक्षक, सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व कारागृह अधीक्षक हे सदस्य आहेत.

सदर समिती व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांना कमाल शिक्षेच्या ¼ कालावधी न्यायाधीन बंदी म्हणून झालेल्या बंदयांची यादी न्यायाधीन बंदी पुनर्वलिोकन समिती व जिल्हा विधी सेवा प्राधीकरण यांना केंद्रीय गृहमंत्रालयाच्या निर्देशाने सादर करणेबाबत सर्व कारागृहांना सूचना देण्यात आल्या आहेत व त्यानुसार सर्व राज्यातील कारागृहामध्ये सदर कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य सरकारी चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटनेच्या विविध मागण्यांबाबत**

**(३६) १००८९२ (२६-१२-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सरकारी चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटनेच्या वतीने वाढीव वेतन, सातवा वेतन आयोगाचा लाभ अनुकंपा जागांची भरती अशा विविध मागण्याकरिता दिनांक २६ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास काम बंद आंदोलन पुकारण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास , संघटनेच्या वतीने मा. मुख्यमंत्र्यांना देण्यात आलेल्या निवेदनावर कर्मचाऱ्यांच्या मागण्या मा. मुख्यमंत्र्यांनी तत्त्वता मान्य केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०२-२०१८) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

(३) गट विमा योजनेच्या मासिक हप्त्याची रक्कम वाढविण्याबाबत मागणी होती, त्यानुषंगाने दि.३०.१.२०१६ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. तसेच गट क च्या पदावर

पदोन्नतीचे प्रमाणे ५० % करण्याची मागणीही सातत्याने करण्यात येत होती. त्या अनुषंगाने दि. १४.१.२०१६ च्या शासन निर्णयान्वये या प्रमाणात वाढ करण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती संबंधित विभागाकडून मागविण्यात आली आहे. विविध मागण्यासंदर्भात चर्चा करण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे बैठक आयोजित करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाच्या सेवेत अनुकंपातत्वावरील उमेदवारांना घेण्याबाबत**

**(३७) १००९३२ (०६-०१-२०१८). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या वतीने राज्यातील अनुकंपा तत्वावर नोकर भरती धोरणामध्ये एकूण रिक्त होणाऱ्या पदांच्या ५% जागा अनुकंपातत्वावरील उमेदवारांना असल्याने बहुतांशी उमेदवारांना नोकरीपासून वंचित रहावे लागते याकरीता ही अट शिथील करून त्याची मर्यादा १५% करण्याकरीता व या उमेदवारांना तात्काळ शासन सेवेत घेणेकरीता मा.मुख्यमंत्री व राज्यमंत्री सामान्य प्रशासन यांचेकडे लोकप्रतिनिधींनी लेखी पत्राव्दारे दिनांक ३ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास मा.राज्यमंत्री सामान्य प्रशासन यांच्याकडे राज्यातील एकूण अनुकंपाबाबत आढावा घेतला असता एकूण रिक्त पदांच्या ५ % जागा या अनुकंपातत्वारील अमेदवारांकरीता असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील किती अनुकंपाधारक उमेदवारांनी नोकरी मिळणेबाबत विनंती अर्ज केले आहेत त्याची जिल्हावार व विभागनिहाय माहिती उपलब्ध आहे काय,
(४) असल्यास, अनुकंपा तत्वावरील उमेदवारांना प्रतिक्षायादी नुसार तात्काळ नोकरी मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०२-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

शासन निर्णय, सा.प्र.वि., दि. २२.०८.२००५ अन्वये अनुकंपा नियुक्तीसाठी गट-क व गट-ड मध्ये प्रतिवर्षी रिक्त होणा-या पदाच्या ५% पदांची मर्यादा विहीत करण्यात आली होती. या मर्यादेमुळे अनुकंपाधाकांना प्रत्यक्ष नियुक्ती मिळण्यासाठी प्रदिर्घकाळ प्रतिक्षा करावी लागत असल्याने, अनुकंपाधारकांच्या प्रतीक्षासूचीतील उमेदवारांना कमीत कमी कालावधीत नियुक्ती मिळावी ही बाब विचारात घेऊन शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि.०१.०३.२०१४ नुसार अनुकंपा नियुक्तीसाठी असलेल्या प्रतीवर्षी रिक्त होणा-या पदांच्या ५% या मर्यादेमध्ये वाढ करुन ती प्रती वर्षी रिक्त होणा-या पदांच्या १०% इतकी करण्यात आली. सदर शासन निर्णयामध्ये एक वर्षानंतर फेरआढावा घेण्याबाबतची तरतुद होती. त्या अनुषंगाने शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र.अकंपा-१२१५/ प्र.क्र.४७/आठ, दि.२८.१०.२०१५ अन्वये अनुकंपा नियुक्तीसाठी प्रतिवर्षी रिक्त होणा-या पदांच्या १०% असलेल्या मर्यादेस दि. ०१.०३.२०१५

पासून पुढे दि. २८.०२.२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. त्यानंतर शासन निर्णय, क्र.अकंपा-१२१७/प्र.क्र.४६/आठ, दि. ०३.०५.२०१७ अन्वये अनुकंपा नियुक्तीसाठी प्रतिवर्षी रिक्त होणा-या पदांच्या १०% असलेल्या मर्यादेस) दि. ०१.०३.२०१७ पासून पुढे दोन वर्ष (दि. २८.०२.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तथापि शासनाचे पद भरतीवरील निर्बंध विचारात घेता, सदर निर्बंध असेपर्यंत भरावयास मान्यता असलेलया पदांच्या १०% पदे ही अनुकंपा नियुक्तीने भरण्यात येतात.

अनुकंपा नियुक्तीसाठी असलेली १०% ची मर्यादा शिथील करुन सदर मर्यादा वाढविण्याबाबत मा. मुख्यमंत्री व राज्यमंत्री सामान्य प्रशासन यांचेकडे लोकप्रतिनिधीनी लेखी पत्राद्वारे मागणी केलेली असून सदर मागण्या मा.मंत्री, वित्त यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रीमंडळ उपसमितीसमोर विचारार्थ ठेवण्यात आल्या आहेत.

(३) अनुकंपाधारकांची जिल्हावार व विभागनिहाय माहिती उपलब्ध असून माहे सप्टेंबर, २०१७ अखेर गट-क मधील पदासाठी १९,०२७ व गट-ड मधील पदासाठी १२,३३८ असे एकूण ३१,३६५ अनुकंपाधारक उमेदवारांनी अर्ज केले असून त्यापैकी १७,६६१ उमेदवारांना नियुक्त्या दिल्या असून १०,९९० उमेदवार अनुकंपा नियुक्तीच्या प्रतीक्षासूचीवर आहेत.

(४) व (५) शासन निर्णय सा.प्र.वि., क्र.अकंपा-१२१५/प्र.क्र.१२७/आठ, दि.२०.०६.२०१५ अन्वये मा.मंत्री, वित्त यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील राज्य शासकीय / निमशासकीय / महामंडळातील अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी अनुकंपा धोरण सुधारणे आणि त्याचबरोबर प्रकल्पग्रस्तांना शासकीय नोक-यांमध्ये भरती करण्यासंबंधी आढावा घेणे व त्या अनुषंगाने प्रभावी उपाययोजना सूचविण्यासाठी मंत्रीमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली असून मंत्रीमंडळ उपसमितीच्या अद्यापपर्यंत ५ बैठका झालेल्या आहेत.

---

## वसई (जि.ठाणे) येथील पार्वती परिसरात दुचाकीस्वाराने वाहतुक पोलीसाला केलेली मारहाण

**(३८) १००९६३ (०६-०१-२०१८). श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.ठाणे) येथील पार्वती परिसरात दिनांक ७ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास दुचाकीस्वाराने वाहतुक पोलीसाला जबर मारहाण करून दुचाकीस्वार पळून गेला असून अद्यापपर्यंत त्याच्यावर कोणतीच कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०२-२०१८) :** (१) व (२) सदर प्रकरणी माणिकपुर पोलीस स्टेशन, पालघर येथे गु.र.क्र. २३४/२०१७, भा.दं.वि. कलम ३५३, ३३२, ५०४, ५०६, १८६ अन्वये एका आरोपीविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नमुद गुन्ह्यातील आरोपीस अटक करुन त्याचेविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असुन सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सृष्टी कॉम्प्लेक्स, मीरारोड (पूर्व) (जि.ठाणे) या परिसरामध्ये लहान मुलींचे अपहरण करणा-या टोळीबाबत**

**(३९) १००९७९ (०६-०१-२०१८). श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सृष्टी कॉम्प्लेक्स, मीरारोड (पूर्व) (जि.ठाणे) या परिसरामध्ये लहान मुलींचे अपहरण करुन इतरत्र विक्री करणारी टोळी कार्यरत असून सदर टोळीने २ मुली विकल्याचे दिनांक १४ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी केलेल्या चौकशी अंती दोन्ही पिडीत मुलींना अनुक्रमे अमृतसर व हरिद्वार येथुन अपहरण करुन आणल्याचे निष्पन्न झाल्याने काशिमीरा पोलीस स्टेशन, ठाणे ग्रामीण येथे गु.र.क्र. ३९२/२०१७, भा. दं. वि. कलम ३६३, ३६५, ३६६(अ), ३७०(१), ३७०(५), ३७२, ३७३, ३२८, ३४२, ३४ सह बाल न्याय अधिनियम, २०१५ चे कलम ८१, ८४ सह लैंगिक अपराधांपासुन बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम १८ अन्वये ११ आरोपीविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नमुद गुन्ह्यातील ११ आरोपींना अटक करुन त्यांचेविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असुन सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नळेगाव (ता.चाकूर, जि.लातूर) येथे पोलीस स्टेशन सुरु करण्याबाबत**

**(४०) १०१२८५ (०६-०१-२०१८). श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नळेगाव (ता.चाकूर, जि.लातुर) येथे पोलीस स्टेशन सुरू करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नळेगाव या गावची लोकसंख्या २० हजार असून ३३ पेक्षा अधिक गावांची मध्यवर्ती बाजारपेठ असल्याने व अतिसंवेदनशील तसेच तणावाचे वातावरण सतत निर्माण होत असल्याने सुरक्षेच्या दृष्टीकोनातून या गावात पोलीस स्टेशन मंजूर करणे हे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणी पोलीस स्टेशन सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०१८) :** (१), (२) व (३) पोलीस अधीक्षक, लातूर यांच्या आस्थापनेवरील चाकुर पोलीस ठाणे अंतर्गतचे दुरक्षेत्र नळेगाव येथे पोलीस ठाणे सुरु करण्याची बाब राज्य पोलीस दलातील पदनिर्मितीच्या चौथ्या टप्प्यामध्ये प्रस्तावित आहे. सद्यस्थितीत राज्य पोलीस दलातील पदनिर्मितीच्या दुसऱ्या टप्प्यास मान्यता देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय (दादर, मुंबई) येथील कर्मचाऱ्यांनी विविध मागण्यासाठी सुरु केलेल्या आंदोलनाबाबत**

**(४१) १०१६७८ (२९-१२-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या शारदा सिनेमाच्या गांधी सिने एक्झिबीटर्ससोबत झालेल्या करारानुसार सदरहू एक्झिबीटर्सने पोटभाडेकरू ठेवून आर्थिक लाभ घेतला असल्याने ग्रंथालयाच्या फायद्यासाठी हा करार नव्याने वाढवू नये तसेच किमान वेतन कायद्यानुसार वेतन श्रेणीचा विचार व्हावा आणि ग्रंथ संग्रहालयाच्या कर्मचाऱ्यांना वेतन वाढ मिळावी, या मागण्यांसाठी मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय (दादर, मुंबई) येथील कर्मचाऱ्यांनी दिनांक ८ नोव्हेंबर, २०१७ रोजी पासून बेमुदत उपोषण आंदोलन सुरु केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त कर्मचाऱ्यांच्या विविध मांगण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०१८) :** (१) दि.३० नोव्हेंबर, २०१७ रोजी कन्सेंट टर्म्सची मुदत संपताच मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या ताब्यात सब लायसन्सी सहित जागा असून गांधी सिने एक्झिबीटर्स बरोबर कोणताही वाढीव करार करण्यात आलेला नाही.

तसेच कर्मचाऱ्यांनी बेमुदत उपोषण आंदोलन केले ही बाब खरी आहे.
(२) सदर प्रकरणी कर्मचाऱ्यांच्या बदल्या, पगारवाढ व उर्वरित मागण्यांबाबत मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय या शासन मान्य ग्रंथालय असलेल्या स्वायत्त संस्थेशी संबंधित असून संस्थेच्या आर्थिक सक्षमतेनुसार वेतनवाढ दिलेली आहे.
(३) मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय प्रशासनाचा दृष्टीकोन कर्मचाऱ्यांच्या हितास अनुरुप असून त्यानुसार आगामी काळात कर्मचाऱ्यांसमवेत सामंजस अशा बैठका घेऊन त्यांच्या इतर मागण्यांचा विचार करण्यात येईल.

---

**बांबवडे (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) येथील पोलीस चौकी इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत**

**(४२) १०१९७३ (०६-०१-२०१८). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर-रत्नागिरी महामार्गावरील शाहुवाडी तालुक्यातील (जि.कोल्हापूर) प्रमुख बाजारपेठ तसेच संवेदनशील राजकीय घडामोडींचे केंद्र म्हणून बांबवडे गावाची ओळख आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बांबवडे गावासह परिसरातील कायदा व सुव्यवस्था सुरळीत राखण्यासाठी बसस्थानका शेजारी पोलीस चौकीची इमारत असून ती अत्यंत जीर्ण झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जीर्ण इमारतींना झाडाझुडपांनी विळखा घातला असून भिंतीना तडे गेले आहेत तसेच पावसाळ्यात गळती होत असल्याने सदर इमारतीमध्ये राहणे पोलीस कर्मचाऱ्यांना धोकादायक झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदरहू ठिकाणी नवीन पोलीस इमारत बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०२-२०१८) :** (१), (२) व (३) बांबवडे, ता.शाहूवाडी जि.कोल्हापूर येथील पोलीस चौकीची इमारत सुस्थितीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील वाढती गुन्हेगारी रोखण्याबाबत**

**(४३) १०२१५६ (०६-०१-२०१८). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील पोलिस यंत्रणाकडून होत असलेल्या दुर्लक्षामुळे या जिल्हयात खुन, घरफोडी, दरोडा या प्रकरणात मोठ्या प्रमाणात वाढ होऊन कायदा व सुव्यवस्था बिघडलेली असल्याची माहिती माहे ऑक्टोबर-२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील एक वर्षापासून नांदेड जिल्हयात किती खुन, घरफोडी, दरोडा घडले व या प्रकरणातील किती प्रकरणाचा शोध घेऊन दोषींवर कारवाई केल्याचा तपशील काय आहे,

(३) असल्यास, नांदेड जिल्हयातील वाढती गुन्हेगारी रोखण्याबाबत कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान खुन, घरफोडी, दरोड्याचे गुन्ह्यांचे घटनेमुळे किंवा अन्य कोणत्याही घटनेमुळे नांदेड जिल्हयात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला नाही.

माहे ऑक्टोबर, २०१६ च्या तुलनेत माहे ऑक्टोबर २०१७ मध्ये खुन, घरफोडी, दरोडा या सदराखाली नांदेड जिल्हयात घडलेल्या गुन्ह्यांची तुलनात्मक माहिती खालील नमुद प्रमाणे सादर आहे.

| गुन्ह्याचा प्रकार | माहे ऑक्टोबर २०१६ | | माहे ऑक्टोबर २०१७ | | फरक |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल | उघड | दाखल | उघड | |
| खुन | ६ | ६ | ४ | ३ | -२ |
| घरफोडी | २५ | १० | ३१ | ६ | +६ |
| दरोडा | २ | १ | ० | ० | +२ |

(२) सन २०१६ आणि सन २०१७ मध्ये नांदेड जिल्ह्यात खुन, घरफोडी व दरोडा या सदराखाली दाखल गुन्ह्यांची तुलनात्मक माहिती खालील नमुद प्रमाणे सादर आहे.

| गुन्ह्याचा प्रकार | २०१६ | | २०१७ | | फरक |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल | उघड | दाखल | उघड | |
| खुन | ७५ | ७० | ५९ | ५७ | -१६ |
| घरफोडी | २९१ | ६१ | २९५ | ७६ | +४ |
| दरोडा | १० | ०९ | १२ | १० | +२ |

(३) विविध गुन्ह्यास प्रतिबंध करण्यासाठी नांदेड जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशनच्या स्तरावर, उप विभाग स्तरावर तसेच जिल्हा स्तरावर नाईट पेट्रोलींग, केंद्रीय नाईट पेट्रोलींग योजना तयार करण्यात आली आहे. दररोज रात्री २३.०० ते ०४.०० वाजे पावेतो योजना प्रमाणे पोलीस अधिकारी व कर्मचारी नेमण्यात येवून रात्रगस्त व पेट्रोलींग करण्यात आहे.

दररोज नाईट पेट्रोलींग दरम्यान अचानक नाकाबंदी करुन संशयीत वाहने/संशयीत व्यक्ती व अभिलेखावरील गुन्हेगार चेक करुन कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे. सकाळी ०५.०० ते ०६.०० दरम्यान गुडमॉर्निग पेट्रोलींग दररोज करण्यात येत आहे.

नांदेड जिल्हयातील इतर पोलीस स्टेशनच्या विद्यार्थीनी व महिला विरुध्द गुन्ह्यास प्रतिबंध करण्यासाठी नांदेड जिल्हयातील शाळा, महाविद्यालय, खजगी शिकवणी (ट्युशन क्लासेसच्या ठिकाणी) इत्यादी ठिकाणी महिला गस्तपथकाव्दारे नियमित पेट्रोलींग करण्यात येत आहे.

नांदेड शहरात सेफ सिटी प्रोजेक्ट अंतर्गत नांदेड शहरात महत्वाच्या ४७ ठिकाणी एकूण ९७ सी.सी.टी.वी. कॅमेरे स्थापित करण्यात आलेले आहेत. तसेच, जिल्हा कारागृहातून सुटलेले मालमत्ता संबंधाने गुन्हयातील सक्रिय गुन्हेगार तसेच अभिलेखावरील सक्रिय गुन्हेगारांचे हालचालीवर लक्ष ठेवून त्यांचे विरुध्द प्रतिबंधक कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) विलंब झालेला नाही.

**शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, लोहारा (जि.उस्मानाबाद) येथे विविध ट्रेड सुरु करण्याबाबत**

**(४४) १०२४५२ (०६-०१-२०१८). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, लोहारा (जि.उस्मानाबाद) येथे सद्यस्थितीत वायरमन व कोपा हे दोनच ट्रेड सुरु असल्याने या ठिकाणी यांत्रिकी डिझेल, इलेकट्रीशियन, फिटर, वेल्डर, मोटार मेकॅनिक हे सर्व ट्रेड सुरु करावे व अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी यांत्रिकी डिझेल ट्रेडची स्वतंत्र बॅच सुरु करावी याबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३० ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०१-०३-२०१८) :** (१) अशा प्रकारच्या मागणीचे कोणतेही निवेदन शासनास प्राप्त झालेले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर विमान हवाई वाहतूकीचा परवाना रद्द केल्याबाबत**

**(४५) १०२७५७ (०६-०१-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूरची विमानसेवा सन २०११ पासून बंद असून कोल्हापूर विमान हवाई वाहतूकीचा परवाना रद्द केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूरची विमान सेवा सुरू करण्याबाबत शासनस्तरावरून कोणती कार्यवाही वा पाठपुरावा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०१-२०१८) :** (१) कोल्हापूर विमानतळ भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाचे आहे. सद्यस्थितीत, या विमानतळास दि.१५.१२.२०१७ पासून परिचालन परवाना (Operational Licence) प्रदान करण्यात आलेला आहे.

(२) व (३) या विमानतळावरुन "उडान (RCS)" अंतर्गत विमानसेवा सुरु करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## माणगाव (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथे अवैध दारू विक्री मोठ्या प्रमाणात होत असल्याबाबत

**(४६) १०२७६० (०६-०१-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माणगाव (ता.हातकणंगल, जि.कोल्हापूर) येथील अवैध दारू विक्रीस जिल्हा पोलीस प्रमुखांनी बंदी करण्याचे आदेश देऊनही मोठ्या प्रमाणात अवैध दारू विक्री सुरू असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१८) :** (१), (२) व (३) जिल्ह्यातील संपुर्ण अवैध धंदे बंद करण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत, हे खरे आहे. तथापि, माणगांव येथे मोठ्या प्रमाणावर अवैध दारु विक्री सुरु असल्याचे म्हणणे खरे नाही.

सदर गावामध्ये दि.०६/१२/२०१७ व दि. ११/१२/२०१७ रोजी धाडीचे आयोजन करुन, पोलीस ठाणे हातकणंगले येथे गु.र.नं. २६८/२०१७ व २७३/२०१७ मुंबई दारुबंदी कायदा कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले असून, मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहेत.

रेकॉर्ड वरील अवैध दारु विक्री करणारे विरुध्द मुंबई दारुबंदी कायदा कलम ९३ प्रमाणे हद्दपारीचे प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

## राज्यातील हाफकिन महामंडळातील (मुंबई) सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्याना शासन निवृत्तीवेतन मिळण्याबाबत

**(४७) १०२९०१ (२९-१२-२०१७). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील हाफकिन महामंडळातील (मुंबई) सेवानिवृत्त कर्मचारी श्री तुकाराम एस. कदम व अन्य कर्मचाऱ्यांनी मा.अन्न व औषधी प्रशासन व संसदीय कार्य, मंत्री यांना दिनांक १७ जुलै,२०१४ रोजी निवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासन निवृत्तीवेतन मिळण्याबाबत निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरविकास, सार्वजनिक आरोग्य व गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र.H FN-२२७३/५४४४७-G-III-A दिनांक ३० एप्रिल १९७५ मध्ये १सप्टेंबर १९७५ पासून हाफकिन इन्स्टिट्युट फॉर रिसर्च, ट्रेनिंग अँड टेस्टिंग व हाफकिन बायो फार्मस्युटीकल

कॉर्पोरेशन लि. या दोन स्वतंत्र संस्थांमध्ये येथील अधिकारी व कर्मचारी यांची विभागणी केली तरी या निर्णयात On such appointment their terms and conditions of service under the new Institute, or corporation should not be less favourable than their existing terms and conditions of service या शब्दात या संबंधीचा लाभ देणे संदर्भात शासनाने निसंदिग्ध खात्री दिली , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांना उपदान देतेवेळेस त्यांचा सेवाकाळ एकसलग धरणेत आला असतानाही त्याच पद्धतीने निवृत्ती वेतन देण्याबाबत शासन धोरणात्मक निर्णय घेणार आहे किंवा कसे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२२-०३-२०१८) :** (१) तत्कालीन मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) महोदय यांना दि.१८/०६/२०१४ रोजी श्री.टी.एस.कदम (सेवानिवृत्त कर्मचारी) यांनी निवृत्ती वेतनाचा लाभ मिळणेबाबत निवेदन सादर केले आहे.

(२) नगर विकास, सार्वजनिक आरोग्य व गृहनिर्माण विभागाच्या दि.३०/४/१९७५ मधील शासन निर्णयातील परिच्छेद क्र.४ मध्ये सदर बाब नमूद केली आहे.

(३) प्रस्तुत प्रकरण शासन स्तरावर विचाराधीन आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**करंजी व मोहदा (ता.केळापुर, जि.यवतमाळ) या परीसरामध्ये मोठ्या प्रमाणात अवैध व्यवसाय सुरू असल्याबाबत**

**(४८) १०३३७१ (०६-०१-२०१८). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करंजी व मोहदा (ता. केळापुर, जि.यवतमाळ) या परीसरामध्ये अवैध व्यवसाय दारू विक्री, मटका व जुगार चालु असल्याचे तेथील नागरीकांनी दिलेल्या निवेदनावरून दिनांक १५ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याभागातील पोलीस अधिकाऱ्याच्या निष्काळजीपणामुळे अवैध व्यवसाय करणाऱ्या व्यावसायीकांना मोकळीक मिळत असून त्यामुळे सामान्य नागरीकांना त्रास होतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार अवैध व्यवसाय करणाऱ्यांवर तसेच ते सुरू ठेवण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) मौजा करंजी व मोहदा पोलीसांकडून अवैध व्यवसायिकांना कोणत्याही प्रकारे मोकळीक दिली नसून पोलीसांकडून परिसरात अवैध व्यवसाय करणाऱ्या विरुध्द वेळोवेळी छापे घालून कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे. सन २०१७ मध्ये मुंबई दारुबंदी व मुंबई जुगार कायदान्वये खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

मौजा कंरजी येथे करण्यात आलेली कारवाई

| दारुबंदी कायदा | | | जुगार कायदा | | |
|---|---|---|---|---|---|
| एकूण केसेस | एकूण आरोपी | जप्त माल | एकूण केसेस | एकूण आरोपी | जप्त माल |
| ४९ | ५३ | २०५०५२ | ५ | १२ | ८१४६ |

मौजा मोहदा येथे करण्यात आलेली कारवाई

| दारुबंदी कायदा | | | जुगार कायदा | | |
|---|---|---|---|---|---|
| एकूण केसेस | एकूण आरोपी | जप्त माल | एकूण केसेस | एकूण आरोपी | जप्त माल |
| २५ | २७ | ३४८ | ६ | १३ | ९२४० |

(३) व (४) मौजा करंजी व मोहदा पोलीसांकडून अवैध धंद्यांवर छापे टाकून मुंबई दारुबंदी कायदा व मुंबई जुगार कायद्यान्वये केसेस केलेल्या आहेत.

अवैध व्यवसाय करणाऱ्यांवर प्रचिलित कायदान्वये गुन्हे नोंदवून तपासांअती दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करुन कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**१८७ जणांना म्हाडाची सदनिका देतो असे सांगून कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याबाबत**

**(४९) १०३४४० (०६-०१-२०१८). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर (मुंबई) परिसरात राहणारे रोहन मोरे यांनी दिनांक २३ सप्टेंबर २०१७ रोजी वा त्या सुमारास भोईवाडा पोलीस ठाण्यात म्हाडाच्या सदनिका देतो असे सांगून लाखो रुपयांना फसविणाऱ्या स्वामी उर्फ रामदास भास्कर चव्हाण, बंटी उर्फ विजेंद्र यशवंत पेडकलकर, मोहम्मद हसन अब्दुल अजीज कुरेशी, अमित बाळासाहेब जावळे यांच्याविरुध्द तक्रार केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी केलेल्या तपासामुळे या व्यक्तींना अटक केल्यामुळे या व्यक्तींनी १८७ जणांना म्हाडाची सदनिका देतो असे सांगून कोट्यवधी रुपयांना फसविल्याची बाब उघडकीस आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशाच प्रकारची लेखी तक्रार लोकप्रतिनिधी यांनी पोलीस आयुक्त, क्रॉफर्ड मार्केट चौक, मुंबई यांचेकडे दिनांक ७ जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास श्रीमती शोभना शोधन किर या महिलेला म्हाडाची सदनिका देतो सांगून फसविणाऱ्या व्यक्तींच्या नावासह ४० ते ५० पाने पुराव्यांसह तक्रारीसोबत जोडून देऊनही अद्यापी संबंधीत तक्रारीची कोणतीही दखल पोलीस आयुक्तांनी घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार लोकप्रतिनिधीने पो.आयुक्तांकडे लेखी तक्रार पुराव्याच्या कागदपत्रांसह दाखल करुनही त्याकडे हेतूत:दुर्लक्ष करणाऱ्या पोलीस आयुक्तालयातील संबंधीत दोषी अधिकाऱ्यांविरुध्द व म्हाडाची सदनिका देतो असे सांगुन फसविणा-या टोळींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०२-२०१८) :** (१) होय हे खरे आहे.

सदर प्रकरणी दिलेल्या फिर्यादीवरुन भोईवाडा पोलीस स्टेशन, मुंबई येथे गु.र.क्र. २०६/२०१७, भा.दं.वि. कलम ४१७, ४२०, ४६७, ४६८, ४७१, ३४ अन्वये ४ आरोपीविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नमुद गुन्ह्यातील आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असुन सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(२) सदर गुन्ह्याच्या तपासात अद्यापपर्यंत २५ जणांची फसवणुक झाल्याचे निष्पन्न झाले असुन त्यामध्ये अंदाजे रु. १,१६,४९,८९०/- इतक्या रकमेची फसवणुक झाली आहे.
(३) हे खरे नाही.

श्रीमती. शोभना शोभन किर यांनी दि. ८.७.२०१५ रोजी खेरवाडी पोलीस ठाणे येथे दिलेल्या तक्रारअर्जाच्या चौकशी अंती तेथे गु.र.क्र. ३५/२०१६, भा.दंअ.वि. कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १७० ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नमुद गुन्ह्यातील ४ आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असुन सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(४) सदर प्रकरणी लोकप्रतिनिधींनी पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्याकडे दि. ७.७.२०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी तक्रार करण्यापुर्वीच उपरोक्त प्रमाणे गुन्हा नोंद करुन कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुलुंड (मुंबई) येथील सोनापूर जंक्शन वरील वाहतूक पोलीसांच्या चौकीला कारने दिलेली धडक

**(५०) १०३५१५ (०६-०१-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुलुंड (मुंबई) येथील सोनापूर जंक्शनवरील वाहतूक पोलीसांच्या चौकीला भरधाव वेगाने आलेल्या कारने दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास पहाटे धडक दिली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अपघातात वाहतूक पोलीसांसह तिघेजण गंभीर जखमी झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कार चालकावर कारवाई करण्याबाबत तसेच अपघातात जखमी झालेल्या पोलीसांना मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) नाही.

सदर घटनेमध्ये एक पोलीस व एक कारचालक (आरोपी) असे दोघेजण जखमी झाले.
(३) व (४) दिनांक १५.०९.२०१७ रोजी ००.४० चे दरम्यान घटनेतील मद्यधुंद अवस्थेतील मोटार कारचालक हा मुलुंडला जाण्यासाठी सोनापूर जंक्शन येथे आला असता तेथील रस्त्यावरुन पुढे जाणाऱ्या दुसऱ्या मोटार कारला पाठीमागून ठोकर मारुन व डिव्हायडर तोडून विरुध्द दिशेने गेला व मोटारवरील ताबा सुटल्याने सोनापूर जंक्शनवरील वाहतूक पोलीस चौकीस धडकला.

याबाबत मुलुंड पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३५९/२०१७, भा.दं.वि.कलम २७९, ३३७, ४२७, ४२९ सह १८४ मो.वा.का. सह सार्वजनिक संपत्ती हानी प्रतिबंधक अधिनियम, १९८४ चे कलम ३ अन्वये गुन्हा नोंद करण्यांत आला आहे. दिनांक १३.११.२०१७ रोजी मा.न्यायालयात गुन्हयाचे दोषारोपपत्रदाखल करण्यांत आले असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ट आहे. आरोपीस दिनांक २०.०९.२०१७ रोजी अटक करण्यांत आली असून त्याच दिवशी जामीन मिळाला आहे.

अपघातात जखमी झालेल्या वाहतूक पोलीसावर फोर्टीज हॉस्पिटल, मुलुंड (प), मुंबई येथे तर आरोपी चालकावर मुलुंड जनरल हॉस्पिटल, मुंबई येथे उपचार करण्यांत आले होते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.